
Impact Factor-7.675 (SJIF)

ISSN-2278-9308

# B.Aadhar

## Peer-Reviewed Indexed
## Multidisciplinary International Research Journal

September-2020








**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor:**
Dr.Dinesh W.Nichit
Principal
Sant Gadge Maharaj
Art's Comm,Sci Collage,
Walgaon.Dist. Amravati.

**Executive Editor:**
Dr.Sanjay J. Kothari
Head, Deptt. of Economics,
G.S.Tompe Arts Comm,Sci Collage
Chandur Bazar Dist. Amravati

B.Aadhar

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : *www.aadharsocial.com*

Aadhar Publications

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ((SJIF) -7.675, Issue NO, 243 (CCXLIII)
ISSN : 2278-9308
September, 2020

# INDEX



| No. | Title of the Paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | एका कोळीयाने : एक चिंतन | डॉ. राजेंद्र गोविंदराव नाईकवाडे | 1 |
| 2 | नागपूर जिल्हातील कळमेश्वर तहसिलमधील शिक्षणसंस्थाचे अभिक्षेत्रीय स्वरूप – एक भौगोलीक अध्ययन | डॉ. प्रमोद आसाराम वडते | 5 |
| 3 | डॉ.सुरंशचन्द्र शुक्ल के नाटकों में दर्शनिक चिंतन | डॉ.प्रमोद परदेशी | 10 |
| 4 | लोकशाही प्रकियेत महिला व तरुणांचा सहभाग | प्रा.ज्योती काळबांडे | 14 |
| 5 | संत साहित्यातील लोकतत्त्वीय विचार | प्रा. मोरे भास्कर निवृत्ती | 19 |
| 6 | संतसाहित्यातील उपेक्षितांचा प्रतिनिधी : 'चोखामेळा | प्रा.डॉ. प्रल्हाद वावरे | 23 |
| 7 | पँथर ज. वि. पवार रू चळवळ आणि साहित्य : एक झोत | डॉ.प्रफुल्ल गवई | 27 |
| 8 | वर्तमान भारत–अमेरिका संबंधों में निर्भरता। | डॉ. कांतराव पोले | 31 |
| 9 | भारतीय शेती व कृषी धोरण | डॉ.अनिल श्री. खांडेकर | 33 |
| 10 | मराठी लोकगीतातील समाज जीवन | प्रा. पुरुषोत्तम एस. निर्मळ | 37 |
| 11 | इंदिरा संत यांच्या कवितेची आस्वादक सौंदर्यस्थळे | डॉ. मीता दिनकरराव कांबळे | 43 |
| 12 | जगतिक व्यापार संघटना आणि भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापारावरील परिणाम | कदम विश्वनाथ बाजीराव | 47 |
| 13 | अध्ययन अक्षमता असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणात येणाऱ्या अडचणी व उपाययोजना | कु. योगिता गायकवाड / डॉ. ह्षिकेश दलाई | 50 |
| 14 | प्राचीन भारतीय शिक्षणाची उद्दिष्टे व ध्येये | प्रा.डॉ. डी.एल. पाटील | 59 |
| 15 | पंचशील में प्रतिबिंबित नैतिक मूल्य | डॉ. मनोहर तुळशीराम कुंभारे | 63 |
| 16 | कोरोना विषाणूचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम आणि उपलब्ध संधी (उपाय) | प्रा. डॉ. गोवर्धन खेडकर | 69 |
| 17 | शंकराचार्यांचा अव्दैत सिध्दान्त आणि संत ज्ञानदेवांचा अमृतानुभव | प्रा.डॉ.राजेंद्र हावरे | 73 |
| 18 | म.गांधी यांच्या विचारांचे विविध पैलू | प्रा.डॉ.सुदर्शन सदाशिव क्षेत्री | 81 |
| 19 | कोरोना बेरोजगारीत वाढ व रोजगारातील मंदी | प्रा.डॉ.जयंत एम. बनसोड | 84 |
| 20 | कोविड १९ के कारण तालाबंदी से श्रमिकों के आंतरिक रिवर्समाइग्रेशन उत्पन्न चुनौतियां एवं समाधान | नितिन प्यारेलालजी सिंघवी | 93 |

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675, Issue NO, 243 (CCXLIII)
ISSN : 2278-9308
September 2020

# पँथर ज. वि. पवार : चळवळ आणि साहित्य : एक झोत

डॉ. प्रफुल्ल गवई
एस पी एम कॉलेज चिखली,बुलढाणा

**प्रस्तावना :**

दलित साहित्याचा झंझावात असलेल्या ज.वि. पवार यांनी १५ जुलै २०१८ रोजी आपल्या वयाच्या पंच्याहत्तरीत पदार्पणकेले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार आणि कार्याने प्रेरित झालेल्याज.वि.पवार यांनी आपले सर्व आयुष्य आंबेडकरी चळवळीत वाहून घेतले. या चळवळीसाठी पूरक साहित्यही त्यांनी सातत्याने लिहिले आहे. म्हणून ७५ वर्षाचातरुण नेता असे त्यांना म्हणणे वावगे ठरणार नाही. प्रचंड ऊर्जा असलेले त्यांचे व्यक्तिमत्त्व आहे.सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, साहित्यिक आणि शैक्षणिक ह्या सर्वचआघाड्यांवरत्यांनी निष्ठेने काम केले आहे. त्यांनी लिहिलेल्या साहित्याने समाजाला दिशादेण्याचे महत्त्वाचे कार्य केले आहे. प्रस्तुत निबंधातून ज.वि.पवार यांचा आंबेडकरी चळवळीत असलेला सहभाग आणि त्यातून त्यांनी निर्माण केलेले साहित्य यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

**पँथरची चळवळ आणि ज.वि. पवार**

१९७०च्या काळात दलितांच्या अधिकारासाठी लढणारी संघटना म्हणून दलित पँथर ची स्थापनाझाली. या संघटनेत ज. वि. पवार यांचा सिंहाचा वाटा होता."१९६०नंतरच्या दशकात नवकवी नवसाहित्याची एक पिढी समोर आली. त्यातून अनेक बंडखोरउदयास आले आणि पुढे प्रस्थापितांचे बळीही होऊन गेले. त्यातलाच एक होतानामदेव ढसाळ. आणि त्यांचाच सवंगडी होता ज.वि. पवार. या दोघांच्या वेदनाशब्दातून व्यक्त व्हायच्या आणि जगासमोर एक वास्तववादी अविष्कार यायचा, त्यातूनच मग १९७० नंतर दलित चळवळीला एक नवा धुमारा फुटला, जो आज दलित पँथरम्हणून समजला जातो. त्या पँथरचे पहिले पत्रकही ज.वि. च्या घरच्यापत्त्यानिशी छापले गेले होते. काळाची गरज असलेली ती घटना घडवणारा ज.वि. कधीनेता होऊ शकला नाही वा कधी त्याची तशी आकांक्षाही नव्हती. कुठले पद वाअधिकारासाठी त्याचा पाय नेहमी मागेच राहिला. पण मग साठ वर्ष उलटूनगेल्यावरही कुठल्या पदाशिवाय जगलेला ज.वि. तितकाच फ्रेश ताजातवाना वाटतो."[१]आजही ज. वि. पवारसातत्याने चळवळीत लढत आहेत. "चळवळ आणि नोकरी करत करत ज. वि. चा प्रवास झाला आहे.जवींना कुणी चालती बोलाती चळवळ, चळवळीचे मुक्त विद्यापीठ, चळवळीचे आधारध्येय असे विविध संबोधन देतात शिवाय तसेच व्यक्तिमत्व ज.वि. ना लाभले आहे."चळवळजगत असलेले ज वि. आंबेडकर चळवळीत ते १९५९ पासून कार्यरत होते. आणिप्रत्यक्ष सहभाग १९६४ पासून भूमीहिनांच्या चळवळीत घेतला असला तरी ज.वि. ७०च्या दशकात पंथरच्या चळवळीद्वारे महाराष्ट्राला माहित झाले. दलित पँथर ते भारिप असात्यांचा एकूण प्रवास आहे. पँथरच्या चळवळीत ते प्रत्येक आंदोलनात, सभेत, मोर्चात, शिष्टमंडळात पुढे असत. १९७२ साली त्यांनी राष्ट्रीयकृत बँक असलेल्या बँकऑफ इंडियातून नोकरीला सुरुवात केली. त्या अगोदर त्यांनी टेलिफोन कार्यालयातनोकरी केली. पँथर चळवळीत अनेकांच्या नोकऱ्या गेल्या. काहींनी स्वतःहूनसोडल्या. परंतु ज.वि. पवारांनी कधीही आपल्या नोकरीवर टाच येऊ दिली नाही.ज.वि. चळवळीतील तेल लावलेले पहिलवान आहेत. त्यामुळे ते कुणाच्या हाती लागलेनाहीत."[२]

आंबेडकरी चळवळीविषयी असीम निष्ठा त्यांच्या मनात आहे. त्यांचे जीवन आणिचळवळ यांची अत्यंत मजबूत अशी नाळ जोडलेली आहे.

**कवी ज. वि. पवार**

कवीज.वि. पवार हे मराठी साहित्याला पँथर चळवळीने दिलेले कवी आहेत. 'एका हाती कविता आणि दुसऱ्याहातात पँथरचा झेंडा' अशी वाटचाल त्यांनी केली आहे. 'नाकेबंदी' (१९७६) हा महत्त्वाचा कवितासंग्रह त्यांनी चळवळीच्या अनुषंगानेच लिहिला आहे.

*तू निघाला तेव्हा काळोखाचं राज्य होतं*
*सुर्यफुलांनी पाठ फिरवली होती*
*माळवाटेनं जायचं नाकारलसं तेव्हा*
*खाच खळग्यांनी तुझं स्वागत केलं.*

*तू आलास परिस्थितीवर स्वार*
*आणि घडवलास नवा इतिहास"*

'दलितपँथर'या लढाऊ संस्थेचे संस्थापक सचिव म्हणून ज. वि. पवार यांनी काम केले.तसेच राजा ढाले यांनी संपादन केलेल्या 'मास मूव्हमेंट' चे ते प्रवर्तक, दलितांच्या सामाजिक चळवळीमध्ये ते अग्रेसर राहिले, नामांतराच्या चळवळीत सक्रीयसहभागही नोंदविला, नागपूर येथील चौथ्या फुले-आंबेडकरी साहित्य संमेलनाचेअध्यक्षपद त्यांनी भुषविले, 'नाकेबंदी' हा त्यांचा पहिला काव्यसंग्रहइंग्रजीत, 'ब्लॉकेड' या नावाने प्रकाशित झाला. 'बलिदान'ही त्यांची कादंबरीप्रकाशित झाली असून दलित जाणीव त्यांच्या साहित्यातून आविष्कृत झाली आहे. आपल्यासाहित्याची भूमिका विशद करतांना 'नाकेबंदी च्या मनोगतात ज. वि. पवारम्हणतात, "आम्ही या साहित्याकडे चळवळ म्हणूनच पाहत होतो. मी तर चळवळीतूनसाहित्य अन् साहित्यातून चळवळ उभारीत होतो. काही लोक काठावर उभे राहून चळवळन्याहाळत होते. चळवळीपासून दूर पळत होते अन् तरीही या चळवळीचे आम्हीचकर्ते करविते आहोत अशी शेखी मिरवित होते."[3] आपल्या साहित्याची भूमिकावरीलप्रमाणे रोखठोकपणे ते विशद करतात. कवी आपल्या कवितेची प्रेरणाचफुले-आंबेडकर मानतात. चळवळीसाठी साहित्यनिर्माणकरणारा कवी नव्या स्थित्यंतरच्या शोधात आहे, त्यामुळे ही 'नाकेबंदी' कविलाअस्वस्थ करत आहे. काव्यसंग्रहाच्या सुरवातीच्या काही ओळीत हा आशय जोरकसपणे आला आहे.

*'कालपरवा माझ्याजवळचे शस्त्र हिरावून घेतलेत*
*आज त्याला जवळ करताच न्यायासनासमोर उभे केलेत*
*फुलांशी खेळणाऱ्या वयात मी निखाऱ्यांशी खेळतोय.*
*मोकळ्या हवेत बागडणाऱ्या वयात मी कारावास भोगतोय.'*

(नाकेबंदी, पृ.क्र. १७)

"कारावासभोगावा" तसे या व्यवस्थेने 'जीवन' वाटयाला दिले आहे.'फुलांशी खेळणाऱ्यावयात 'निखाऱ्यांनी' खेळण्याची वेळ व्यवस्थेने लेखकाच्या समूहावर आणलेलीआहे. असे कवी नमूद करतो. डॉ. आंबेडकर या प्रेरणास्त्रोताशी संवाद करतानाकवी ज. वि. पवार म्हणतात,

*"तू निघालास तेव्हा काळोखाचं राज्य होतं*
*सूर्यफुलांनी पाठ फिरविली होती*
*मळवाटेने जायचे नाकारलेस तेव्हा*
*खाचखळग्यांनी तुझे स्वागत केले*
*ठेचाळलास रक्ताळलास कधी निर्भत्सना सहनलीस*
*तरीही तू पुढेच चाललास*
*पाठी मागे/ उधाणलेला समुद्र*
*तू झालास परिस्थितीवर स्वार / आणि घडविलास नवा इतिहास*
*तू झालास मूक समाजाचा नायक*
*आणि जागा केलास उभा बहिष्कृत भारत"*
*पुढे कवी म्हणतो,*

*'आणि तू, तू पेटवतोयस मला*
*आता समुद्राला आग आपणच लावली पाहिजे'*

(आज पन्नास वर्षांनी, पृ.क्र. १८-१९)

डॉ.आंबेडकरांच्या जीवनातील संघर्षमय गाथेचा उल्लेख करून डॉ. आंबेडकरांनी 'नवाइतिहास घडविला. परिस्थितीवर मात करून, मूक समाजाचा नायक होऊ बहुजन समाजजागा केल्याचे कवी अभिमानाने नोंदवतो आहे. यामुळेच कवीलाही स्वतःच्याअस्तित्वाचे भान आले आहे. तू पेटवतोस मला' या शब्दात कवी नव्या लढाईसाठी सिद्धझाला आहे.

लोकशाहीचा हा समर्थक म्हणून ज. वि. पवार नव्या संघर्षासाठी सिद्ध होणार आहे. म्हणून तो व्यवस्थेला एक प्रश्न विचारतो.'

'तरीही तुम्ही लोकशाहीचे दांडोरे पिटताहात; पिटा बापडे हेही लक्षात असू द्या,
घेंबभर पाण्यासाठी रक्ताचे पडतील सडे
लोकशाहीचे रक्षक म्हणता: याही प्रश्नाचे उत्तर तुम्ही द्या.
या जहरी वाऱ्यांना पिऊन मी वादळ झालो तर ते तुम्हाला चालेल ना?'

(एक प्रश्न, पृ.क्र. ४९)

'जहरी' वाऱ्याला पिऊन कवी 'वादळ' झाला आहे. आयाबहीणींच्यावर झालेला अन्याय अत्याचारपाहून कवी अस्वस्थ झाला आहे. म्हणून ह्या शोषणमुक्त भारताच्या नवनिर्मितीसाठी कवी लढाऊ कार्यकर्ता झाला आहे. एकूण ज. वि. पवार यांची कविता 'नाकेबंदी झाल्याने नवा श्वास घेवून क्रांतीच्या पाखरांचे गीत झालेली आहे.

राजाढाले 'नाकेबंदी' या कविता संग्रहातील प्रस्तावनेत म्हणतातः "पवारांचीकविता वैयक्तिक त्यापेक्षा सामाजिक आशयाने भारलेली आहे. किंबहुना त्याचावैयक्तिक आशय हा त्याच्या सामाजिक दुःखाहून अलग नाही. म्हणून ही कविताव्यक्तीची नसून समाजाची आहे. ही कविता एकसूरी नसून तिला समाजाच्या दुःखाचेअनेक सूर आहेत. ज्यांचे दुःख सबंध समाजाला व्यापून शतकानुशतके उरले आहे.त्यांनी गायिलेली गाणी ही कोरसमध्येच असतील. तरी सुद्धा पूर्वसूरीची छटानसलेला हा कोरसही कधीच न ऐकायला मिळालेला आहे. त्यामुळे काही नाजूक लोकांनातो 'लाऊड' वाटेल पण तो त्यांना येथून पुढे ऐकावाच लागेल.''[४] ज.वि. पवारांची कविता महत्त्वाचे समाजजीवन, समाजवेदना व्यक्त करणारी कविताआहे.आपल्या कवितेची भूमिका काय आहे? या संदर्भात स्वतः ज.वि. म्हणतात,

*"माझी कविता संघर्षाची कविता*
*दिलीच बंदूक तिने हातात तुमच्या*
*तर प्रतारु नका तिला*
*उडालाच भडका तर पळू नका दोस्त*
*माझी कविताच देईल तुम्हाला*
*हमीचं बळ आणि शहाणपण"*

मनोरंजनतातिचे प्रयोजन मूल्य नाही तिने संघर्षाचा वसा घेतला आहे. हा कवी व्यवस्थेचेऑपरेशन करणारा आहे. डॉ. आंबेडकरांची प्रेरणा घेऊन लिहिणारा कार्यकर्ता कवीआहे.

*तु झालास परिस्थितीवर स्वार*
*आणि घडविलास नवा इतिहास*
*तू झालास मूक समाजाचा नायक*
*आणि जागा केलास उभा बहिष्कृत भारत'*

डॉ.बाबासाहेब आंबेडकर, दलित चळवळ, दलित पँथर, अत्याचार, शोषण, गरिबी, विषमता, विद्रोह, नकार, नव्या मूल्याचा स्विकार, बंडखोर प्रतिमा, प्रतिभा, शब्द सामर्थ्य हेसर्व ज. वि.च्या कवितेत पेरलेले आहे. नव्या जगाचे, जातमुक्त शोषण-मुक्तीचेनवे स्वरुप ज.वि. पवार यांनी आपल्या कवितेत मांडलेले आहे.

**कादंबरीकार ज.वि. पवार**

ज.वि.पवार यांनी 'बलिदान' ही एक महत्त्वाची कादंबरी लिहिली आहे. कादंबरीप्रकारातील नवा प्रयोग म्हणून या कादंबरीकडे पाहता येईल. 'सत्य' पराजीतहोतांना, कर्तव्याची मुस्कटदाबी,उध्वस्त जीवनाचे वास्तव या कादंबरीत त्यांनी मांडलेआहे. 'जगन' या पात्राच्या बलीदानाची ही कादंबरी आहे."याकादंबरीतउतावळेपणा जगणारा गोविंद आहे, प्रेमासाठी उतरणारी सुमती आहे.रेखा आहे. स्वप्नावर जगणारी विजू समाजकार्य या ओंगळ नावाखाली आयुष्य बर्बादकरणारा राजा, वनिताच्या वडिलांना शह न देणारा, जीवनातला प्रकाश हरवूनबसलेला प्रकाश आहे. पिवळा हत्ती सिगारेटला बळी पडणारा नानू, उद्याच्याप्रकाशासाठी आतुरलेल्या, समोरच्या प्रकाशला लाथाडणारे वनिताचे वडील आहेत.प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेऊन संसाराचा गाडा ओढणारा रघ्या आहे, असेकित्येक माणसांचे विविध नमुने या कादंबरीत इतस्ततः वावरतात."[५]सूक्ष्मनिरीक्षण, अनुभवाची तरलता, काव्यात्मक भाषा, समाजाचे वास्तव ही कादंबरीपुढे

आणताना दिसते. एक प्रयोग म्हणून या कादंबरीचा विचार करतांना त्याकादंबरीची प्रासंगिकताअधोरेखित करतांना गौतमी पुत्रकांबळे म्हणतात. "ज.वि.पवार यांची ही कादंबरी ४८ वर्षापूर्वीची. तिची आजची प्रस्तुतता काय? हामहत्त्वाचा प्रश्नही आणि मुद्दाही. ज्या प्रकारचं समाज वास्तव (अर्धशतकापूर्वीचे) या कादंबरीकेत वर्णन केले. त्यामध्ये आणि आजच्या समाजवास्तवात फारसा फरक पडलाय असे दिसत नाही. फरक जाणवलाच तर तो तपशीलाचा, गटबाजी, पुढाऱ्यांचे हेवेदावे, आरोप-प्रत्यारोप, चुकीच्या निर्णयाचेसमर्थन, स्वार्थ, तसेच समाजात वाढत चाललेली अंधश्रद्धा, व्यसनाधिनता, स्मशानभूमी असू दे नाही तर नामकरणविधी निरर्थक बडबड करणाऱ्यांची दिवसेंदिवसवाढत चाललेली संख्या. (जगनने मृत्यूपूर्वीच बोलून दाखविलेले की माझ्याप्रेतावर कोणीही बोलायचे नाही. अगदी चांगले आणि वाईटही. एवढ्या या एकागोष्टीचे जरी आजच्या समाजात अनुकरण झाले तरी पुरे) स्वार्थ आणिं ढोंगीपणा तरआज सार्वत्रिक झालाय. म्हणून आजही एक नव्हे तर शेकडो, हजारो जगनचीचळवळीला, समाजाला गरज आहे. ती गरज पूर्ण करण्याची प्रेरणा आणि मार्गदर्शनकादंबरी आजही करते."[६] असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही.

**इतिहासकार ज.वि. पवार**

ज.वि. पवार यांनी आंबेडकरोत्तर चळवळीचा इतिहास मांडला आहे. आंबेडकरोत्तर आंबेडकरी चळवळ खंड १ (२००२),आंबेडकरीत्तर आंबेडकरी चळवळ खंड २ (२००६) आंबेडकरोत्तर आंबेडकरी चळवळ खंड ३ (२००७),आंबेडकरोत्तर आंबेडकरी चळवळ खंड ४(२०१०),आंबेडकरोत्तर आंबेडकरी चळवळ खंड ५ (२०१४) अशीखंडाची विभागणी केली आहे. तसेच 'माझी चळवळ' (२०१७) 'आंबेडकरोत्तर आंबेडकरीआंदोलन भाग -१' (२०१३) 'नामांतर ते भाषांतर' २०११ अशा ग्रंथसंपदेमधून त्यांनीतटस्थपण चळवळीचा इतिहास मांडला आहे. इंग्रजी भाषेमध्येही त्यांची हीग्रंथसंपदा प्रकाशित झाली आहे."ज.वि. च्याव्यक्तित्व आणि विचारांशी बांधिलकी असणारे लिखाण आहे. असेच लिखाण टिकतेबाकीच्यांचे गडप होते. ज.वि. पवार यांनी ना इलेक्शनमध्ये इंटरेस्ट ना आमदारआणि खासदारकीमध्ये, त्यांचा इंटरेस्ट फक्त संघटनेत आहे असे बाळासाहेबआंबेडकर यांनी त्यांच्या व्यक्तिमत्व आणि साहित्यासाठी म्हटले आहे"[७]एकूणचज.वि. पवार दलित पँथर चळवळीतीलनेतृत्व करणारेएक अत्यंत महत्त्वाचे कार्यकर्ते, नेते, लेखक आणि इतिहासकार आहेत. त्यांच्या व्यक्तिमत्वात, जीवनदृष्टीत डॉ. आंबेडकर यांचा संघर्षशील विचार आहे. डॉ.आंबेडकरांची प्रेरणा घेवूनच त्यांनी आपले समग्रलेखन केले आहे. ज.वि. पवार एकाहातात चळवळीचा झेंडा तर दुस-या हातात लेखणी घेवून व्यवस्थेच्या विरोधात बंड करण्यासाठी उभे आहेत. थोडक्यात ज.वि. पवारयांचे समाजासाठआणि मराठी साहित्यासाठी असलेले महत्वाचे योगदान पुढीलपिटीसाठी मार्गदर्शक ठरणार आहे.

संदर्भ सूची

१)भिमराव आंबेडकर (संपा) : चळवळीशिलेदार ज.वि. पवार अमृत महोत्सवीगोरवग्रंथ. प्रकाशक मा. ज.वि. पवार अमृत महोत्सव गोरव सामती, मुंबई १डिसेंबर २०१८,पृ.क्र.१४

२)तैत्रव पृ.क्र.२३

3)पवारज. वि.,नाकेबंदी, विजय प्रकाशन ,२०३,मनोगत

४) पवारज. वि.,नाकेबंदी, विजय प्रकाशन ,२०३,प्रस्तावना

५)ऊनि पृ.क्र.१०२

६) ऊनिपृ.क्र.२२५

७) ऊनिपृ.क्र.मलपृष्ठ